MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ




सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात

## सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समिती २०२५ च्या वतीने गेवराई शहरात विविध सांस्कृतिक कार्यक्रम व अभिवादन कार्यक्रमात सहभागी व्हावे – श्यामराव गायकवाड पाटील

गेवराई शहरातील सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा २०२५ च्या वतीने येत्या १९ फेब्रुवारी रोजी साजरा करण्यात येत आहे.सकाळी १० वा छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून मा.न्यायाधिश साहेब यांच्या प्रथम अभिवादन करून त्यानंतर तालुका प्रशासन , राजकीय नेते, वकील डॉक्टर, प्रतिष्ठीत नागरिक , पत्रकार ,महीला, युवक, शालेय विद्यार्थ्यी यांचे अभिवादन होणार आहे तसेच सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा निमित्त १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज अभिवादन वेळ सकाळी नऊ ते साडे बारा वाजेपर्यंत राहील त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव सोहळ्याची मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज चौक ते शास्त्री चौका पर्यंत राहील तसेच शालेय विद्यार्थी व स्थानिक कलाकाराचे सादरीकरण १९ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा ते दुपारी दोन वाजेपर्यंत डी वाय एस पी कार्यालया समोर राहील त्यानंतर बक्षीस वितरणाचा कार्यक्रम होईल सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळ्याचे खास अतिथी माननीय हंसराज जगताप ऑस्कर पुरस्कार विजेते व सिने अभिनेते व तसेच कुमारी सिद्धी राऊत अ ब क चित्रपटातील बालकलाकार यांची उपस्थिती राहणार आहे आणि गेवराई शिवजन्मोत्सव सोहळ्यात गेवराई शहरातील व परिसरातील वीस ते पंचवीस शाळांमधील विद्यार्थी ऐतिहासिक ढाल तलवार दांडपट्टा आदीसह कसरती दाखवणार आहे

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०२ | अंक –१५५ | बुधवार दि.१९ फेब्रुवारी २०२५ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रु | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -155 | WEDNESDAY DT.19 FEBRUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# फडणवीस सरकारचा समांतर मराठा आंदोलन उभे करण्याचा डाव

## मनोज जरांगे यांचा मोठा दावा; दोन मंत्र्यांची मदत घेणार असल्याचाही आरोप

धाराशिव /प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकार दोन मंत्र्यांच्या मदतीने समांतर आंदोलन उभे करून मराठा आरक्षणाचे आंदोलन मोडून काढण्याच्या प्रयत्नांत असल्याचा मोठा आरोप मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. त्यांच्या या आरोपामुळे मराठा आरक्षणाचा तिढा आणि आंदोलन अधिकच बिकट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मनोज जरांगे यांच्या नेतृत्वात बुधवारी धाराशिवमध्ये शिवजन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी बोलताना मनोज जरांगे म्हणाले, आम्ही गोरगरिबांच्या मुलांच्या आरक्षणासाठी लढत आहोत. पण सरकारने मराठा आरक्षणाचा हा लढा व मागणी दाबून टाकण्यासाठी २ मंत्र्यांच्या मदतीने नवे आंदोलन उभे करण्याचा डाव रचला आहे. या मंत्र्यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशीही यासंबंधी चर्चा झाली आहे. आम्ही सांगू तसे ऐका अन्यथा षडयंत्र रचून तुम्हाला बदनाम केले जाईल असा सरकारचा प्रयत्न आहे.

येत्या २२ फेब्रुवारी ते २२ मार्च या एका महिन्याच्या कालावधीत आपल्याला काही गोष्टी कराव्या लागणार आहेत. आपण एक राहिलो तरच आपल्याला आरक्षण मिळेल. केवळ गर्दी व मोठ्या सभांमधून आपले प्रश्न सुटणार नाहीत. गावोगावी येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी हक्काचे ठिकाण आपल्याला द्यावे लागणार आहे. त्यासाठी प्रत्येक गावात एक सेवक द्यावा लागेल. संपूर्ण गाव त्याला आपल्या अडचणी सांगेल.

सुरेश धस यांच्यावरील विश्वास उडाला

मनोज जरांगे यांनी यावेळी मंत्री धनंजय मुंडे यांची भेट घेण्यासाठी आमदार सुरेश धस यांच्यावर भाजपने दबाव आणल्याचा आरोपही यावेळी केला. भाजपने मंत्री धनंजय मुंडे यांची भेट घेण्यासाठी सुरेश धस याच्यावर दबाव टाकला. पण सुरेश धस यांनी माझ्यावर माझ्या पक्षाने दबाव आणल्याची गोष्ट मराठा समाजाला सांगण्याची गरज होती. पण त्यांनी असे न करता मुंडे यांची भेट घेतली. आमचा त्यांच्यावर भरपूर जीव होता. पण आता त्यांच्यावरील विश्वास उडाला.

सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांची भेट घेण्यापूर्वी त्याची कल्पना आम्हाला दिली



असती तर मराठे त्यांना डोक्यावर घेऊन नाचले असते. पुढच्या निवडणुकीत १ लाख ६७ हजार मतांनी ते निवडून आले असते. आता धस व मुंडे यांच्या भेटीमुळे संतोष देशमुख दोषारोपपत्रातही छेडछाड होण्याची शक्यता आहे. पण यातील एकही आरोपी सुटला तर या सरकारचे काही खरे नाही, असे मनोज जरांगे म्हणाले.

### कट कारस्थानाला फडणवीसांची साथ

सरकार मराठ्यांच्या आंदोलनापुढे प्रतिआंदोलन उभे करणार आहे. या अंतर्गत दोन मंत्री पाठपुरावा करणार आहेत. ते १२–१३ दिवस आमरण उपोषण करतील. त्यानंतर सरकार बैठक लावण्याचे नाटक करेल. या सर्व कट कारस्थानाला देवेंद्र फडणवीस यांची साथ आहे. हे त्यातील एका मंत्र्यानेच मला सांगितले.

### सरकार मंगळवारपर्यंत तिन्ही गॅझेट लागू करेल

या प्रकरणी पुढील महिनाभर आपल्याला काम करावे लागेल, असे जरांगे म्हणाले. त्यांनी यावेळी मुख्यमंत्री फडणवीस मंगळवारपर्यंत आरक्षणाच्या मुद्यावर मार्ग काढतील, हैदराबाद, बॉम्बे व सातारा गॅझेट लागू करतील असा विश्वासही व्यक्त केला. फडणवीस तिन्ही गॅझेट मंगळवारपर्यंत लागू करतील अशी मला आशा आहे. शिंदे समितीकडे गत ७ महिन्यांपासून हा विषय खितपत पडला आहे. त्यांचा अभ्यास संपला आहे. आता त्यावर अंमलबजावणी करण्याची वेळ आली आहे.

## छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याबरोबर सुराज्याची स्थापना केली – राजेभाऊ फड

### राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने शिवजयंती साजरी; पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती

परळी (प्रतिनिधी)

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्याबरोबर सुराज्याची स्थापना केली. अठरापगड जाती – धर्माच्या प्रजेच्या हिताच्या रक्षणाची त्यांनी विशेष काळजी घेतली. आपल्या राज्यातील जनतेच्या मिरचीच्या देठालाही धक्का लागला नाही पाहिजे असा राजेंचा कटाक्ष होता. म्हणूनच त्यांना सबंध विश्वाचे जाणते राजे अशी पदवी बहाल केली. हेच सुशासन अबाधित राखणे, तोच सलोखा कायम ठेवणे या राज्याचे नागरिक म्हणून आपल्या प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी केले. पक्षाच्या वतीने शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील संपर्क कार्यालयात शिवप्रतिमेचे पूजन करण्यात आले तसेच महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला अभिवादन करण्यात आले.



राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्या नेतृत्वाखाली परळी वैजनाथ शहरात शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्य चौकातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. तसेच पक्षाच्या परळी विधानसभा जनसंपर्क कार्यालयात शिवप्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब शिंदे पाटील, ज्येष्ठ नेते उत्तमदादा माने, शहराध्यक्ष ड.जीवनराव देशमुख, मुक्ताराम गवळी, महिला आघाडीच्या जिल्हा सरचिटणीस मंगलताई सोळंके, तालुकाध्यक्ष वर्षाताई रायभोळे, शहराध्यक्ष कल्पनाताई देशमुख, शिवाजीराव लोमटे, भगवानराजे कदम, प्रकाश मुंडे, युवा कार्यकर्ते अक्षय सोनवणे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलत असताना राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी शिवचरित्रावर प्रकाश टाकला. ते बोलत असताना म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास हा पुढील शेकडो पिढ्यांसाठी प्रेरणादायी आणि आदर्श असा आहे. महाराजांनी उभे केलेले स्वराज्य आणि सुराज्य आजच्या काळात अबाधित राखण्यासाठी सर्वाभिमुख प्रयत्न होणे गरजेचे असल्याचेही प्रतिपादन त्यांनी केले.







# इंडो-ब्रिटिश ग्लोबल स्कूल चे वार्षिक स्नेहसमेलन उत्साहात साजरे

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील शिक्षण क्षेत्रात नावाजलेली अग्रेसर असणारी इंडो-ब्रिटिश ग्लोबल स्कूल अंबाजोगाई स्कूल मध्ये शैक्षणिक वर्ष २०२४- २५ या वर्षी आर्टीफिशियल इंटेलिजन्स आणि डिजिटलायझेशन या संकल्पनेवर आधारित वार्षिक स्नेहसंमेलन महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री.शिवगीर गीर सर,श्री.राजेंद्र गायकवाड सर,श्रीमती स्वाती गिर मॅडम,नेहा माने मॅडम संस्थेचे विश्वस्त श्री.राजेसाहेबजी देशमुख साहेब,श्री किरणजी पाटील साहेब,श्री राहुलजी सोनवणे साहेब,श्री.हनुमंतजी मोरे साहेब,श्री रविकांतजी सोनवणे सर, धीरज पाटील सर प्राचार्य श्री.अरविंद झांबरे सर उपस्थित होते या संस्कृतीक महोत्सवाचे मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. ए आय आणि डिजिटलायजेशन या संकल्पनेच्या



आधारित कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्यातून आणि नाटिकेतून उपस्थित त्यांनी आनंद घेतला.

त्यानंतर मुलांनी उत्कृष्ट असा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थित असलेल्या सर्वांची मनी जिंकली यावेळी मुलांनी हिंदी इंग्लिश गीते देशभक्तीपर गीते असा विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला त्याचबरोबर मुलांना व्यासपीठ निर्माण करू दिल्याबद्दल पालकांनी स्कूलचे आभार मानले तसेच या कार्यक्रमासाठी श्री.संतोष सोनवणे सर व सर्व शिक्षक पालक विद्यार्थी शिक्षक इतर कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इंडो-ब्रिटिश परिवार यांनी पुढाकार घेतला व कार्यक्रमाचे संचलन शाहीन मॅडम तर आभार अमृता मॅडम यांनी मानले.

# किल्लेधारूर बसस्थानकातील बोगस काम पुन्हा सुरू ,अधिकारी कामाकडे फिरकेनात

## माती मिश्रित डस्टचा वापर सिमेंटचा पत्ताच नाही

धारूर / रोहित फावडे

दीर्घ काळानंतर धारूर बस स्थानकाचे काम सुरू झाले परंतु हे काम बोगस व माती मिश्रित होत होत आहे या कामाकडे एसटी महामंडळाचे अधिकारी व प्रशासन लोकप्रतिनिधी यांचे दुर्लक्ष आहे. किल्लेधारूर बस स्थानकामध्ये धुराळ्याचा त्रास नागरिकांना , प्रवाशांना होत होता. अनेकदा एसटी आल्यानंतर चाकांने दगडे उडून प्रवाशांना लागले देखील.

अनेक दिवसांच्या मागणीनंतर हे काम सुरू झाले परंतु सध्या हे काम अतिशय बोगस रित्या सुरू आहे. माती मिश्रित डस्टचा वापर करण्यात येत आहे सिमेंटचा वापर अत्यल्प करण्यात आलेला आहे.किल्लेधारूर बस स्थानकामध्ये एमआयडीसी कार्यालयाच्या माध्यमातून सिमेंट रस्त्याचे काम होत आहे मात्र या रस्त्यासाठी वापरले जाणारे साहित्य पूर्णपणे दर्जाहीन वापरले जात आहे तसेच रस्ता बनवताना रस्त्यावरील भुसभुशीत माती पक्या मुरमापस्थळ काढणे गरजेचे असताना काढण्यात आलेली नाही तसेच रस्ता




मजबूत व टिकाऊ व्हावा म्हणून मुरूम वापरणे गरजेचे असताना वापरलेली नाही. खोदकाम करताना निघालेली माती पुन्हा मुरूम म्हणून तीच वापरली गेली आहे तसेच सिमेंट रस्त्याच्या पहिल्या थरासाठी वापरण्यात आलेले सिमेंट हलक्या दर्जाचे तर ईको स्यांड हे माती मिश्रित वापरण्यात आले आहे त्यामुळे कामांमध्ये पूर्ण अनियमितता दिसून येत आहे आणि असे असताना मात्र एमआयडीसीचे अधिकारी या गंभीर बाबीकडे सपशेल दुर्लक्ष करताना दिसून येत आहेत तसेच भ्रमणध्वनी वरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्याशी संपर्क होत नसल्याने गुत्तेदार याचा पूर्णपणे गैरफायदा घेत असून धारूर बस स्थानकातील सिमेंट रस्त्याचे काम दर्जाहीन करून उरखण्याचा सपाटा संबंधित गुत्तेदाराने लावलेला आहे त्यामुळे हे होत असलेले दर्जाहीन काम प्रवाशांची गरज लक्षात घेऊन दर्जेदार व चांगले काम करावे अशी मागणी होत आहे. यात अधिकारी वर्गाने गांभीर्याने लक्ष द्यावे अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# नेकनूर ग्रामपंचायत सदस्यांचा मासिक सभेवर बहिष्कार

नेकनूर(प्रतिनिधी)

नेकनूर येथील ग्रामपंचायतमध्ये सध्या ग्रामपंचायत अधिकारी बदलीच्या मुद्यावरून मोठे राजकीय वादंग निर्माण झाले आहे. काही दिवसांपूर्वी कार्यरत असलेले ग्रामपंचायत अधिकारी एस.बी. वाघमारे यांची अचानक बदली करण्यात आली,आणि त्यांच्या जागेवर राहुल वीर यांची नियुक्ती करण्यात आली. मात्र,ग्रामपंचायत सदस्यांनी वाघमारे यांच्यावर विश्वास व्यक्त करत, त्यांनाच पुन्हा नियुक्त करण्याची मागणी केली आहे.ग्रामसेवक बदलल्याने नाराज असलेल्या ग्रामपंचायत सदस्यांनी काल आयोजित मासिक सभेला पाठ फिरवली. एकूण १७ सदस्यांपैकी केवळ ५ सदस्यच उपस्थित राहिले, तर उर्वरित सदस्यांनी बैठकीवर बहिष्कार टाकला. यामुळे ग्रामपंचायतीच्या निर्णय प्रक्रियेत अडथळा निर्माण झाला असून, यावरून चर्चा सुरू आहे.नेकनूर ग्रामपंचायतीतील बहुतांश सदस्य आणि स्थानिक नागरिक ग्रामपंचायत अधिकारी वाघमारे यांच्या कामावर समाधानी होते. त्यांनी विकासकामे, शासकीय योजना आणि गावातील प्रशासन चांगल्या पद्धतीने हाताळल्याने त्यांना

पुन्हा रुजू करून घेण्याची मागणी करण्यात येत आहे. ग्रामपंचायत अधिकारी बदली करणे हा प्रशासकीय निर्णय आहे, मात्र नेकनूर मध्ये स्थानिक राजकीय व्यक्तींकडून सरपंच यांना हाताशी धरून हस्तक्षेप केला जात आहे, असे काही सदस्यांचे म्हणणे आहे. ग्रामसेवक बदली प्रकरणावर लवकरच वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक होणार असल्याचे समजते.वरिष्ठ अधिकारी काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी अँड .विनायक जाधव

## तर उपाध्यक्षपदी सोमेश्वर सोनटक्के, प्रकाशराव काशिद व सचिवपदी बालासाहेब फपाळ यांच्या निवडी जाहीर

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई अंतर्गत बीड जिल्ह्याच्या ग्रामीण बीड जिल्हाध्यक्षपदी वडवणी येथील पत्रकार अँड. विनायकराव जाधव यांची तर उपाध्यक्षपदी सोमेश्वर सोनटक्के, प्रकाशराव काशीद तर सचिवपदी बालासाहेब फपाळ , कार्याध्यक्षपदी किसनराव भदरगे यांची सर्वानुमते निवड जाहीर करण्यात आली. या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे संस्थापक संजयजी भोकरे साहेब यांच्या आदेशानुसार तर सरचिटणीस विश्वासराव आरोटे साहेब, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली १८ फेब्रुवारी रोजी तेलगाव येथे सायंकाळी ४ वाजता माजलगाव, धारूर, वडवणी



कार्यक्षेत्रातील पत्रकारांची निवडी संदर्भात व्यापक बैठक झाली. या बैठकीमध्ये सर्वानुमते या कार्यक्षेत्रासाठी बीड ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी अँड विनायक जाधव यांची तर उपाध्यक्षपदी सोमेश्वर सोनटक्के, प्रकाशराव काशिद तर सचिवपदी बालासाहेब फपाळ व कार्याध्यक्षपदी किसनराव भदरगे यांच्या निवडी सर्वानुमते खेळीमेळीच्या वातावरणात जाहीर करण्यात आल्या.यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई संघटनेच्या वाढीसाठी विचार विनिमय करून आगामी काळात संघटनेचे ध्येय धोरणे ठरविण्यात आले. यावेळी माजलगाव येथील पत्रकार सुदर्शन स्वामी, सुहास बोराडे, सय्यद आखिल, अँड.मस्के, सतिष राव मुजमुले, शंकर झाडे, शंकर जाधव,शेख एजाज, अर्जुन मुंडे, विष्णु डोईफोडे यासह माजलगाव, धारूर, वडवणी तालुक्यातील महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे पदाधिकारी, सदस्य,पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी नुतन निवड झालेल्या बीड जिल्हा पदाधिकारी यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले आहे.महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी यांनी एक नवीन पायंडा सुरू केला आहे. पत्रकार संघटनेच्या जिल्हा कार्यकारिणीमध्ये ग्रामीण भागातील वडवणी, माजलगाव, धारूर तालुक्यातील पत्रकार यांना जिल्हास्तरावर काम करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. याबद्दल नुतन जिल्हा अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, कार्याध्यक्ष व पदाधिकारी यांनी स्वामी सर यांचे आभार मानले आहेत.

# श्रीमंतयोगी श्री छत्रपती शिवाजी महाराज :- एक विचार, जो युगानुयुगे प्रेरणा देतो!

## श्री बंकटस्वामी महाविद्यालयात श्रीमंतयोगी श्री छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव साजरा

**बीड ।प्रतिनिधी**

**दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी येथील श्री बंकटस्वामी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने श्रीमंतयोगी श्री छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव प्रेरणादायी वातावरणात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विवेक मिरगणे होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा.युवराज महाडिक उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या प्रसंगी उपप्राचार्य डॉ.शिवाजी मोरे व कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा.ब्रम्हनाथ मेंगडे व्यासपीठावर उपस्थित होते.या कार्यक्रमाची सुरुवात श्रीमंतयोगी श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर या कार्यक्रमाचे प्रास्ताविक**



**प्रा.डॉ.बाबासाहेब जावळे यांनी केले.कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थिनी कु.मयुरी नाईकवाडे हिने शिवाजी महाराजांवरील पाळणा सादर करून उपस्थितांचे मन जिंकले.** प्रा.डॉ.नीता बावणे आणि प्रा.नितीन चव्हाण यांनी शिवचरित्रावर आधारित कविता सादर केली. तसेच डॉ.राजीव काळे यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनातील विविध पैलूंवर मार्गदर्शन केले.या कार्यक्रमात कु.प्रतीक्षा शेळके आणि कु.अश्विनी गायकवाड यांनी जोशपूर्ण भाषण सादर करून महाराजांचे महान कार्य आणि विचार उलगडले. प्रा.अमोल घोलप यांनी आपल्या शैलीत छत्रपती शिवाजी महाराजांवरील पोवाडा सादर करून कार्यक्रमात जोश निर्माण केला.प्रमुख मार्गदर्शक प्रा. युवराज महाडिक यांनी आपल्या भाषणात शिवाजी महाराजांचे शेतीविषयक धोरण, स्वामीनिष्ठता, स्त्री सन्मान, तसेच तत्कालीन राजकीय आणि सामाजिक परिस्थिती यावर मोलाचे विचार मांडले.कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ.विवेक मिरगणे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात शिवाजी महाराज हे संपूर्ण मानव जातीला प्रेरणा देणारे राजा असल्याचे सांगितले. साडेतीनशे वर्षांपूर्वी जन्मलेला राजा आजही आपल्याला प्रेरणा देतो, म्हणूनच आपण त्यांचा जन्मोत्सव साजरा करतो असे मत त्यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ.महादेव जगताप यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ.अनिकेत भोसले यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी प्राध्यापक, शिक्षक,कर्मचारी उपस्थित होते.

# गरजू महिलांना साडी व किराणा किटचे वाटप



अनिल राधे मित्र मंडळाचा पुढाकार

माजलगाव ।प्रतिनिधी

येथील अनिल राधे मित्र मंडळाच्या वतीने समाजातील उपेक्षित वंचित व गरजू महिलांना पालावर जाऊन १०० महिलांना साडी तर ब्रह्मगावातील ऊसतोड मजुरांच्या कुटुंबातील ५० महिलांना किराणा किटचे वाटप शिवजयंती निमित्त करण्यात आले. शहरातील अनिल राधे मित्र मंडळाच्या वतीने महापुरुषांच्या जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. आगळ्या वेगळ्या पद्धतीने जयंती साजरी करण्याची परंपरा अनिल राधे मित्र मंडळाने जोपासली आहे. शिवजयंतीनिमित्त आगळावेगळा उपक्रम राबवत केसापुरी कॅम्प परिसरात पालावर राहणाऱ्या १०० गरजू महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले तर ब्रह्मगावातील ऊसतोड मजुरांच्या कुटुंबीयांतील ५० महिलांना किराणा किटचे वाटप कार्यक्रम ही अनिल राधे मित्र मंडळाच्या वतीने घेण्यात आला. यावेळी उपसरपंच अनिल राधे कांबळे, पत्रकार अनंत घडसिंगे, विलास लोंढे, आसाराम खंडागळे, जयंती कमिटीचे अध्यक्ष प्रवीण कांबळे, उपाध्यक्ष किरण शिंदे, सचिव युवराज कांबळे, कोषाध्यक्ष विक्रांत कांबळे, बबलू सोळंके, वैभव बापमारे, गोविंद अनभुले, संकेत जाधव, आदित्य वाघमारे, प्रदीप कांबळे, अभिषेक वाघमारे, संकेत जाधव, सुमित कांबळे, ईश्वर येवले, प्रशांत कांबळे, अनिकेत कांबळे, चेतन अलझेंडे, प्रवीण अंकुश कांबळे, सतीश कांबळे, दादा कांबळे यांचेसह अनिल राधे मित्र मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.



**छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त अभिवादन केले त्यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, युवक जिल्हाध्यक्ष अनुरथ वीर, सहसंघटक अर्जुन जवंजाळ, बीड तालुकाध्यक्ष किरण वाघमारे, बीड शहराध्यक्ष लखन जोगदंड, मिलिंद सरपते यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते....**

# शहापूर मजरा येथे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी

तालखेड ।प्रतिनिधी

माजलगावं तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शहापूर मजरा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संतोष गाढवे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.जय भवानी जय शिवाजी अशा घोषणा देण्यात आल्या या होते. शाळेचे मुख्याध्यापक श्री साबळे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवना विषयी माहिती सांगितली विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा आत्मसात करावी त्यांच्यासारखे शूरवीर बनावे तसेच सर्वांनी छत्रपती शिवाजी महाराज प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आली वेळी सरपंच, उपसरपंच सह गावातील सर्व नागरिक युवा तरुण मोठ्या संख्येने उपस्थित





## उत्सव स्वराज्याच्या राजाचा

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्रीमंतयोगी राजे श्री.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर व राष्ट्रवादी चे जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के साहेब यांनी बीड शहरातील शिवतीर्थावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून मानाचा मुजरा केला.यावेळी शिवसेनेचे जिल्हा संघटक रतन तात्या गुजर,शहर प्रमुख शेख निजाम भाई, युवानेते अक्षय काळे सह सर्व शिवभक्त उपस्थित होते...!!



कडा - येथे शिवजयंती निमित्त अभिवादन करताना पत्रकार रहेमान सय्यद,कु.रूकैय्या बिलाल सय्यद, कासिम रहेमान सय्यद,कु.सलमा बिलाल सय्यद दिसत आहेत.



कृषी अधिकारी कृषी चिकित्सालय फळरोप वाटीका माजलगांव येथे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करताना कृषी अधिकारी कृ प्रियंका झणझणे गोवरव बापमारे गणेश थोरात रणजित गायकवाड बाबासाहेब पवार वैभव भोला आदी उपस्थित होते



बीड : (प्रतिनिधी) : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त शिवतीर्थ येथे बीड जिल्हा गुरुकुल असोसिएशनच्या वतीने महाराजांना अभिवादन करण्यात आले. यावेळी संघटनेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# शिक्षण विभागाला जागा करण्यासाठी कार्यालयासमोर जागरण गोंधळआंदोलन करणार-वर्षाताई जगदाळे

बीड ।प्रतिनिधी

मिल्लीया माध्यमिक शाळेतील अन्यायाविरोधात रहेमत बेगम अजमत उल्लाह खान या मागील अनेक दिवसांपासून लढा देत आहेत. दिनांक २५ जानेवारी २०२५ पासून त्या जिल्हा परिषद शिक्षण विभाग कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसल्या आहेत. मात्र, प्रशासनाने अद्यापही त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले आहे.महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) शिक्षण विभागाला इशारा दिला आहे. दिनांक २५ फेब्रुवारी २०२५ रोजी जर त्यांच्या मागण्या पूर्ण केल्या नाहीत, तर मनसेतर्फे शिक्षण विभाग



कार्यालयासमोर जागरण गोंधळ आंदोलन करण्यात येईल, असा इशारा मनसे राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी दिला आहे.

रहेमत बेगम या ऊळरलशींशी आणि इश्रेव झीर्शीीीश सारख्या गंभीर आजारांनी त्रस्त असताना देखील, प्रशासनाने त्यांच्या आरोग्याची काळजी घेतलेली नाही. मिल्लिय शाळेशी संबंधित या प्रकरणाचा वारंवार पाठपुरावा करूनही कोणतीही कार्यवाही झालेली नाही, असा आरोप करण्यात येत आहे.मनसेने प्रशासनाला कडक शब्दांत इशारा देत म्हटले आहे की, राज्य माहिती आयोगाच्या आदेशांची अंमलबजावणी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई झाली नाही, तर पुढील सर्व परिणामांना शिक्षण विभाग जबाबदार राहील.आता प्रशासन यावर काय भूमिका घेते आणि मनसे आंदोलनाची पुढील दिशा काय असेल ?हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# मूकनायक व दर्पण दिनानिमीत पुरस्कार वितरण सोहळा

प्रतिनिधी । गेवराई

मूकनायक व दर्पण दिनानिमीत गेवराई येथे प्रति वर्षा प्रमाणे याही वर्षी महाराष्ट्र पत्रकार संघ यांच्या वतीने मूकनायक व दर्पण दिनानिमीत विविध पुरस्कारचे आयोजन केले आहे उल्लेखनिय कार्य करणारास हा विविध पुरस्कारने प्रमुख पाहुण्याच्या शुभ हस्ते सन्मानीत करण्यात येणार आहे या वर्षीचे पुरस्कार प्राप्त मान्यवरामध्ये साप्ताहिक प्रकाश आधार चे संपादक सूनिल पोपळे यांना मूकनायक, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अध्यक्ष गेवराई अंकुश आतकरे यांना दर्पण पुरस्कार,कोल्हेर ग्रामपंचायत सरपंच रामप्रसाद चाळक यांना आदर्श सरपंच पुरस्कार, सिरस मार्ग ग्रामपंचायत सरपंच सुरेश मार्कंड यांना आदर्श सरपंच पुरस्कार,चिखली वडगांव येथील रहीवाशी साईनाथ सुरवशे यांना उद्योगरत्न पुरस्कार,बंगाली पिंपळा येथील रहीवाशी राजु तात्या जाहागीरदार यांना उद्योगरत्न पुरस्कार,सिरसदेवी येथील डॉक्टर मारोती गरड यांना आरोग्य सेवा पुरस्कार, उमापुर येथील डॉक्टर काळे बळीराम यांना आरोग्य सेवा पुरस्कार,धारवंटा येथील शेतकरी सतीश शेळके यांना कृषिरत्न पुरस्कार,पाडळसिंग येथील रहिवासी भिष्मा घोडके यांना आदर्श शिक्षक पुरस्कार,काठोडा येथील शिक्षक शिंदे भारत यांना आदर्श शिक्षक



पुरस्कार,पाचेगांव येथील शिक्षक तुकाराम पवार यांना आदर्श शिक्षक पुरस्कार,राहेरी येथील रहीवाशी जानकी ग्यानोबा फलके यांना आदर्श माता-पिता पुरस्कार,तर गेवराई शहरात आपले शैक्षणीक क्षेत्रात नावलोकिक करणारे शारदा कोंचीग क्लासेसचे अध्यक्ष शिवाजी वराट सर याना शिक्षण

क्षेत्रातील गेवराई भुषण पुरस्कार देउन गोरविण्यात येणार आहे अशा विविध क्षेत्रातील मान्यरांना विविध पुरस्कारने गेवराई येथे सिंधीभवन कार्यालयात दिंनाक २४फेब्रुवारी सोमवारी सकाळी आकरा वाजता हा पुरस्कार सोहळा पार पड़णार आहे या कार्यक्रमाचे अध्यक्ष संत साहित्याचे अभ्यासक श्री मुरहरी केळे मुंबई, तर उदघाटक दैनिक झुंजार सेनापतीचे मुख्य संपादक श्री सोमनाथ पाटील मुंबई यांच्या सह आनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थित हा सोहळा पार पड़णार आहे व मान्यरांच्या शुभहस्ते पुरस्कार प्राप्त मान्यवराना सन्मानीत करण्यात येणार आहे तरी आपन मोठया संख्यानी या पुरस्कार सोहळयाला उपस्थित राहावे आसे आवाहन महाराष्ट्र पत्रकार संघाचे बीड जिल्हाध्यक्ष तथा संपादक हुंबरे बापुसाहेब व जिल्हा सचिव चक्रधर घोडके यांनी केले आहे




## जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा कडा नंबर १ येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी

कडा ।प्रतिनिधी

कडा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा कडा नंबर १ येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शिवजयंतीनिमित्त विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट भाषणे व गीतांवर नृत्य सादर केले.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सर्व शिक्षक, शिक्षिका,शिक्षकेत्तर, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी,मान्यवर, पालक, विद्यार्थी आदी उपस्थित होते.

# शिवजयंतीनिमित्त नाथ चषक बीड प्रिमीअर लिगचे आयोजन : सचिन मुळूक

## शिवसेनेच्या वतीने आयोजित क्रिकेट स्पर्धेचे आज होणार उद्घाटन



बीड (प्रतिनिधी)

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने नाथ चषक बीड प्रीमियर लीग' या भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले आहे. आज बुधवारी (दि.१९) रोजी सकाळी ९ वाजता स्पर्धेचे उदघाटन सी.पी. ग्राउंड पालवन चौक येथे होणार असून पुढील दहा दिवस या क्रिकेट स्पर्धेचा क्रिकेट प्रेमींना आनंद घेता येईल अशी माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी दिली.

बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या पुढाकारातून शिवजयंतीनिमित्त बीडमध्ये प्रथमच नाथ चषक बीड प्रिमीअर लिगचे आयोजन केले आहे. १२ संघांमध्ये ही क्रिकेट स्पर्धा होणार आहे. सी.पी. ग्राउंड पालवन चौक येथे आज बुधवारी (दि.१९) रोजी सकाळी ९ वाजता स्पर्धेचे उद्घाटन जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांच्या उपस्थितीत होणार आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या वतीने विजेत्या संघाला प्रथम ५१ हजार रुपये, द्वितीय ३१ हजार रुपये, तृतीय ११ हजार रुपये आणि चतुर्थ पारितोषीक ११ हजार रुपये देण्यात येणार आहे. मॅन ऑफ द सिरिज ३१०० रुपये व स्मृतिचिन्ह, कॅच ऑफ द टुर्नामेंट २१०० रुपये स्मृतिचिन्ह, बेस्ट बॅट्समन २१०० रुपये व स्मृतिचिन्ह, बेस्ट फिल्डर २१०० रुपये पारितोषीक देण्यात येणार आहे. या शिवाय प्रत्येक हॅटट्रीक(विकेट), बेस्ट किपर, फाइनल मॅन ऑफ द मॅच, फायनल बेस्ट बॉलर, फायनल बेस्ट बॅट्समन यांना प्रत्येकी ११०० रुपये व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित केले जाणार आहे. २८ फेब्रुवारी रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत विजेत्या संघांना पारितोषीक वितरण केले जाणार आहे. सदर स्पर्धा क्रीडा प्रेमींसाठी युट्युबच्या माध्यमातून सर्वदूर पोहोचविण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. पुढील दहा दिवस बीड शहरातील व तालुक्यातील क्रिकेट प्रेमींसाठी या स्पर्धा पर्वणी ठरणार असून जास्तीत जास्त क्रीडा प्रेमींनी स्पर्धेचा लाभ घ्यावा असे आवाहन शिवसेना जिल्हा प्रमुख सचिन मुळूक यांनी केले आहे.

# ना. पंकजाताई मुंडे त्रिपुराच्या दौर्यावर बांबू हस्तकला प्रदर्शनाला दिली भेट

मुंबई (प्रतिनिधी)

महाराष्ट्राच्या हवामान व भौगोलिक परिस्थितीचा विचार करून तसेच शास्त्रीय दृष्टीची सांगड घालून महाराष्ट्र राज्यात बांबू मिशन अमलबजावणीचा निर्णय घेऊन तो प्रभावीपणे राबवू असं राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी म्हटलं आहे.ना. पंकजाताई मुंडे त्रिपुरा राज्याच्या दौर्यावर असून आज सकाळी त्यांचे आगरताळा विमानतळावर भाजपा महिला मोर्चाच्या अध्यक्षा तसेच शासकीय वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वागत केले. राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ, पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिव विनिता सिंघल यावेळी त्यांच्यासमवेत उपस्थित होत्या.

आगरताळा येथील बांबू लागवड प्रदर्शनाला भेट देऊन ना. पंकजाताई मुंडे यांनी महिलांच्या हस्तकला कौशल्याचे भरभरून कौतुक केले तसेच विविध जातीच्या बांबू लागवडीची यावेळी पाहणी केली. त्रिपुरातील बांबू हस्तकला देशातील सर्वोत्तम हस्तकलेपैकी एक आहे तसेच अगरबत्ती बनवण्यासाठी बांबूच्या काड्यांसाठी संपूर्ण देशाच्या गरजांपैकी बहुतांशी गरज या राज्यातून पूर्ण केली जाते. बांबू क्षेत्राच्या एकात्मिक विकासासाठी, पीपीपी फ्रेमवर्क अंतर्गत, २००७ मध्ये त्रिपुरा बांबू मिशन (टीबीएम) सुरू करण्यात आले होते.

त्रिपुरा बांबू हस्तकला त्यांच्या उत्कृष्ट डिझाइन, विस्तृत श्रेणीतील उत्पादनांसाठी आणि कलात्मक आकर्षणासाठी देशातील सर्वोत्तम मानल्या जातात. या प्रदर्शनात विविध जातीच्या बांबूच्या लागवडीचे आणि हस्तकला कौशल्याची पाहणी केल्यानंतर त्यांनी महाराष्ट्राच्या हवामान व भौगोलिक परिस्थितीचा विचार करून तसेच शास्त्रीय दृष्टीची सांगड घालून महाराष्ट्र राज्यात बांबू मिशनची अमलबजावणीचा निर्णय घेण्यात येईल असं सांगितलं.



## त्रिपुराच्या धर्तीवर महाराष्ट्रातही बांबू लागवड मिशन प्रभावीपणे राबवू

# श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप!

## जिद्द, सातत्य, सचोटी आणि प्रामाणिकपणाला कष्टाची जोड असेल तर हमखास यश मिळते- श्री गणेशराव वाघ

शाळेतून दिल्या जाणाऱ्या संस्कारावरच विद्यार्थ्यांचे पुढील भविष्य घडते- सौ. सुदामतीताई वाघ

बीड ।प्रतिनिधी

जिद्द, सातत्य, सचोटी आणि प्रामाणिकपणाला कष्टाची जोड असेल तर जीवनात हमखास यश मिळते. विद्यार्थ्यांनी आपला अमूल्य असा वेळ मोबाईलमध्ये वाया न घालवता वाचनाकडे लक्ष देऊन आपलं ध्येय गाठावे, गरज पडेल तेंव्हा आम्ही सर्व तुमच्या पाठीशी आहोत तुम्ही प्रचंड अभ्यास करून जीवनात उज्ज्वल यश मिळवावे असा सल्ला शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा आदर्श मुख्याध्यापक श्री गणेशराव वाघ सरांनी शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या निरोप समारंभाच्या कार्यक्रमाप्रसंगी मार्गदर्शन करताना दिला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा सौ. सुदामतीताई वाघ या होत्या. तर व्यासपीठावर गावातील ज्येष्ठ नागरिक श्री दिलीप नाना जोगदंड, सौ शालिनीताई जोगदंड, श्री मिथुन जोगदंड, नुकताच एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण झालेला शाळेचा माजी विद्यार्थी चि. शैलेश जोगदंड, शाळेचे मुख्याध्यापक श्री दत्तात्रय चव्हाण सर, श्री आत्माराम वाव्हळ सर, श्रीमती फाटे मॅडम, श्रीमती सानप मॅडम आदी उपस्थित होते.

बीड शहरापासून जवळ असलेल्या शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात काल मंगळवार दि.१८ फेब्रुवारी रोजी दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ आणि एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण झालेला शाळेचा माजी विद्यार्थी चि.शैलेश जोगदंड याचा सत्कार समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संस्थापक



अध्यक्षा सौ. सुदामतीताई वाघ ह्या होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर आलेल्या मान्यवरांचा सत्कार स्वागत गीतासह पुष्पगुच्छ शाल आणि श्रीफळ देऊन करण्यात आला. या सत्कार समारंभानंतर इयत्ता नववी वर्गातील कु. अमृता पाखरे आणि कु. आलिशा शेख यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांबाबत आपले मनोगत व्यक्त करत शुभेच्छा दिल्या. तर इयत्ता दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांच्या वतीने कु. प्रणाली पदमुले हिने मनोगत व्यक्त केले. तसेच प्रमुख पाहुणे श्री मिथुन जोगदंड यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. त्यानंतर शाळेचा माजी विद्यार्थी चि. शैलेश जोगदंड यांने सत्काराला उत्तर देताना आपल्या यशामध्ये आई-वडिलांसोबतच शाळेचा आणि शिक्षकवृंदांचा मोठा वाटा असल्याचे सांगितले. आपण आयुष्यात आपल्या शिदोड गावाला आणि श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाला कधी ही विसरणार नाही. शाळेसाठी माझी गरज लागेल तेव्हा मदतीसाठी सदैव तत्पर राहील अशी ग्वाही या वेळी शैलेश जोगदंड यांने दिली.

त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष श्री गणेशराव वाघ सर यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना संस्थाचालक श्री गणेशराव वाघ साहेब म्हणाले की, प्रत्येक विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत आई - वडील आणि शिक्षकांचा मोठा वाटा असतो. सध्याच्या वातावरणात परिस्थितीमध्ये अनेक विद्यार्थी मोठ्या प्रमाणात व्यसनाधीन झाले आहेत. आपण मात्र या व्यसनापासून दूर रहावे.

कोणत्याही प्रकारचे व्यसन करू नये. दररोज सकस व संतुलित आहार घ्यावा. आजचे अनेक विद्यार्थी मोबाईलच्या व्यसनाच्या विळख्यात मोठ्या प्रमाणात विद्यार्थी अडकले आहेत. आपण वेळीच सावध झाले पाहिजे. मोबाईलचा गरजेपुरताच वापर करावा. या मोबाईल पेक्षा थोर साधू, संत, विचारवंत आणि महापुरुषांच्या पुस्तकांचे वाचन करावे. आपले करिअर घडवण्यासाठी लक्ष केंद्रित करावे. जिद्द, सातत्य, सचोटी आणि प्रामाणिकपणाला कष्टाची जोड असेल तर हमखास यश मिळते हे तत्त्व कायम लक्षात ठेऊन अभ्यास करून आई-वडिलांचे, आपल्या शाळेचे, आपल्या गावाचे नाव उज्ज्वल करावे. विद्यार्थ्यांना जीवनात जेंव्हा आमची गरज पडेल, तेव्हा आम्ही आपल्यासाठी सदैव तत्पर राहून तुम्हाला मदत करू असा दिलासा दिला. शिवाय या वेळी त्यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा सौ. सुदामतीताई वाघ यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. यावेळी

त्यांनी विविध उदाहरणे दाखले आणि गोष्टी सांगितल्या. शाळेतून दिल्या जाणाऱ्या संस्कारावरच विद्यार्थ्यांचे पुढील भविष्य घडते. असे सांगत दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी आणि भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री आत्माराम वाव्हळ सर यांनी केले. तर आभार दत्तात्रय चव्हाण सर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी दहावीचे विद्यार्थी कु. प्रणाली पदमुले आणि चि. संतोष पदमुले या बहिण भावांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येलाशाळेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा भेट दिला. सदरील पुतळा आणि दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांनी शाळेला खुर्चांची दिलेली भेट मान्यवरांच्या शुभ हस्ते स्वीकारण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक



# मधुकर महाराज खाडे यांचे वारकरी संप्रदायातील योगदान अविस्मरणीय

प्रतिनिधी । केज

मधुकर महाराज खाडे हे भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे आधारस्तंभ होते. त्यांचे वारकरी संप्रदायातील योगदान अविस्मरणीय आहे, असे प्रतिपादन होळ येथील संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प.डॉ. प्रल्हाद महाराज ढाकणे शास्त्री यांनी व्यक्त केले.

वै.पै.मधुकर महाराज खाडे यांचे दि.६ फेब्रुवारी रोजी अपघाती निधन झाले. केज तालुक्यातील होळ येथील श्री संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे संस्थापक ह.भ.प.अर्जुन महाराज लाड यांच्या मार्गदर्शनाखाली गंगापुजनानिमित्त भगवान बाबा मंदिरात दि.१३ ते १९ फेब्रुवारी दरम्यान किर्तन सप्ताह होत आहे. ह.भ.प.डॉ. प्रल्हाद महाराज ढाकणे शास्त्री हे मंगळवारी (दि.१८) किर्तन सेवेप्रसंगी बोलत होते. डॉ.प्रल्हाद महाराज ढाकणे शास्त्री यांनी संत तुकाराम महाराज यांचा अनुसरे तो अमर झाला । अंतरला संसारा ।।१।। न देखती गर्भवास । कधीं दास विष्णूचे ।।ध्रु.।। विसंभेना माता बाळा । तैसा लळा पाळावा ।।२।। त्रिभुवनीं ज्याची सत्ता । तो रक्षीता जालिया ।।३।। हा अभंग किर्तन सेवेसाठी घेतला होता.

ढाकणे महाराज म्हणाले, भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे आधारस्तंभ मधुकर महाराज खाडे यांच्या निधनाने पंचक्रोशीची हानी झाली आहे. त्यांनी वारकरी संप्रदायावर नितांत प्रेम केले. संत जोग महाराज पैलवान होते. त्यांनी वारकरी शिक्षण संस्था स्थापन केली. अगदी त्यांचा आदर्श समोर ठेऊन मधुकर खाडे महाराज यांनी होळ येथे वारकरी शिक्षण संस्था सुरू केली. त्यांच्यामुळे किर्तनकार, वारकरी मंडळी होळ परिसराला सहज उपलब्ध होतात. ही खाडे महाराज यांची कृपा आहे. पैलवान मंडळी कधी झुकत नाहीत. अगदी शेवटपर्यंत त्यांनी हा बाणा जपला. तसेच, अर्जुन महाराज लाड यांच्याप्रती असलेली श्रध्दा, निष्ठा कायम ठेवली. त्यांचा आणि काम, क्रोधाचा दुरान्वये संबंध नव्हता, म्हणून ते लोकप्रिय व्यक्तीमत्व बनले, असे मत ढाकणे महाराज यांनी व्यक्त केले. यावेळी होळचे ग्रामस्थ, संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, आजी-माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खा.सुप्रियाताईंना ठेवीदाराचे निवेदन

## जिजाऊ मल्टीस्टेट ठेव घोटाळा इडी अथवा सीआयडी मार्फत चौकशी करा..

बीड ।प्रतिनिधी

जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट को.ऑ.सो.लि. बीड सुमारे २०० कोटीचा घोटाळा झाला. बीड व धाराशिव जिल्ह्यातील सुमारे ३००० ठेवीरांची लुबाडणूक झाली. तपास अधिकारी पो.नि. खाडे यांनी लाच घेऊन अप्रत्यक्ष आरोपींना मदत केली,तपासाचे तीन तेरा वाजवले. पो.नि.खाडे गेले, गोल्डे आले अद्याप जिजाऊ मल्टीस्टेट मधील मुख्य तिजोरीचा पंचनामा झाला नाही. अजब तपास होतो आहे. २०२३ मधील गुन्हा फॉरेन्सिक अहवाल सुद्धा आला नाही.

मुख्य आरोपी बबन शिंदे यांनी अंग झटकले. पोलीस म्हणतात आरोपींचा बीपी वाढतो..जास्त चौकशी करता येत नाही.सखोल तपास झाला पाहिजे. या भुमिकेतुन ठेवीदारांचा लढा चालू आहे.घोटाळ्याचा सर्वंकष छडा लावण्यासाठी एऊ अथवा उइख उच्च स्तरीय तपास यंत्रणा मार्फत चौकशी व्हावी. या मागणीचे निवेदन खा.सुप्रिया सुळे यांना ठेवदारांनी दिले.राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के, खा. बजरंग बाप्पा सोनवणे,आ.संदिप भैया क्षिरसागर यांच्या मार्गदर्शना खाली मस्साजोग ता.केज येथे राष्ट्रवादी नेत्या खा. सुप्रिया सुळे यांची भेट घेऊन...जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट ठेवीदार कृती समितीच्या वतीने.,..

ठेव घोटाळा प्रकरणाची चौकशी एऊ अथवा उखऊमार्फत चौकशी करणे बाबत निवेदन देण्यात आले. यावेळी इंजि. सखाराम कळासे,शेख कुतुब भाई, मारुती तिपाले, भाऊसाहेब



परसे,प्रा.मानेसर,आर.एस. गायकवाड, अच्युतराव वाघ, सुर्यभान नवले, प्रविण पोपळे,आदी उपस्थित होते.या निवेदन म्हणटले आहे की, बीड जिल्ह्यातील जिजाऊ माँसाहेब साहेब मल्टीस्टेट को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सो. लि. बीड या पतसंस्थेच्या अध्यक्षा सौ.अनिता बबन शिंदे , त्यांचे पती बबन विश्वनाथ शिंदे, मुलगा मनिष बबन शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी अश्वीनी वांढरे, आणि संस्थेचे संचालक मंडळ यांनी संगनमताने ठेवीदार बांधवांचा विश्वासघात करुन सुमारे २०० कोटीचा अपहार केला आहे . ३००० पेक्षा अधिक गोरगरीब, मजूर, कामगार, शेतकरी, निवृत्त कर्मचारी ठेवीदारांची लुट केली आहे. या ठेव घोटाळा प्रकरणात दि. ७ जुलै २०२३ दरम्यान ठेवीदारांनी बीड व धाराशिव जिल्ह्यात एकूण चार गुन्हे नोंद केले आहेत. बीड, धाराशिव जिल्ह्यातील अन्यायग्रस्त ठेवीदारांच्या वतीने कृती समितीच्या माध्यमातून मोर्चा आंदोलनातून शासन दरबारी सखोल चौकशीची मागणी केलेली आहे. स्थानिक बीड पोलिस यंत्रणे कडून प्रकरणाचा योग्य पध्दतीने तपास झालेला नाही. दि.२१जानेवारी २०२५ मध्ये ठेवीदारांच्या पाठपुराव्यामुळे एमपीआयडी प्रस्ताव मंजूर झाला. परंतु एमपीआयडी १९९९ कायद्यानुसार हा प्रस्ताव अपूर्ण असून सर्व आरोपी व इतर संबंधीतांच्या मालमत्तांचा समावेश प्रस्तावात केला नाही.फक्त ठेवीदारांनी सुचवलेल्या मालमत्तांचा समावेश असुन पोलीस व महसूल प्रशासनाने मालमत्ता तपास कामी ठोस पाठपुरावा केलेला नाही. पोलीसांनी आरोपीं कडून बीड व इतर जिल्ह्यांतील मालमत्तेची माहीती घेण्याचं धाडस केले नाही. २०२३ मधील गुन्हा परंतु आज ही मुख्य शाखेतील तिजोरीचा पंचनामा झालेला नाही. बँकेत असलेल्या लॉकरची तपासणी झाली नाही. तिजोरी व लॉकर मधील सोनं अथवा चिज वस्तूचं काय झालं. हा प्रश्न अनुत्तरित आहे.

पुर्ण तपास संशयास्पद आहे. फितुर तपास अधिकारी यांनी १कोटी ची लाच मागितली व तसा गुन्हा नोंद आहे. लाच घेतल्याने तपास सकारात्मक दिशेने झाला नाही.याचे स्पष्ट पुरावे समोर आले. आरोपीकडे मालमत्ता लपवलेली असुन निश्चितपणे परदेशात गुंतवणूक केलेली आहे. असा ठाम विश्वास ठेवीदारांचा आहे. शासनाने प्रयत्न केल्यास पैसा व मालमत्ता निश्चितपणे मिळू शकतो. कृपया ठेवीदारांना न्याय देण्यासाठी खालील मुद्द्यांवर लक्ष केंद्रीत करून एऊ अथवा उइख अशा उच्चस्तरीय यंत्रणे मार्फत चौकशी करणे बाबत आपण पूर्णतः सहकार्य करावे. अशी आग्रही मागणी करणारे सविस्तर निवेदन दिले आहे.

# ऑनलाइन जागतिक अबॅकस मध्ये रोहन ढोके सर्वोत्कृष्ट वर्ल्ड चॅम्पियन ऑफ-चॅम्पियन

## रोहन राहुल ढोकेची लंडन चॅम्पियनशिपसाठी निवड!

बीड ।प्रतिनिधी

जानेवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या जागतिक स्तरावरील अबॅकस चॅम्पियनशिपमध्ये बीड शहरातील चंपावती विद्यालयाचा विद्यार्थी रोहन राहुल ढोके याने फक्त पाच मिनिटांमध्ये शंभर प्रश्न सोडवत ऐतिहासिक यश संपादन करत सर्वोत्कृष्ट वर्ल्ड चॅम्पियन ऑफ-चॅम्पियन मिळवली. रोहन ढोके याने चॅम्पियनशिप ऑफ-चॅम्पियन मिळविल्यामुळे त्याची लंडन चॅम्पियनशिप साठी निवड झाली. रोहन ढोके याने मिळवलेल्या या ऐतिहासिक उज्ज्वल यशाबद्दल आणि त्याची लंडन चॅम्पियनशिप साठी निवड झाल्याबद्दल रोहन ढोके याच्यावर सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

शालेय स्तरावरील सर्वांगिन विकास करण्याच्या मार्गाने अबॅकस गणितीय पध्दतीचा उपयोग होत असून शहरातील अबॅकस ट्रेनिंग केंद्राद्वारे, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय , राज्य स्तरावर, अबॅकस चॅम्पियनशिप आयोजित केल्या जातात. जानेवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या जागतिक स्तरावरील अबॅकस चॅम्पियनशिपमध्ये बीड शहरातील चंपावती विद्यालयाचा विद्यार्थी रोहन राहुल ढोकेने अवघ्या पाच मिनिटांमध्ये १०० गणित सोडवून ऐतिहासिक असे उज्ज्वल यश संपादन केले आहे. रोहन राहुल ढोकेने फक्त पाच मिनिटांमध्ये शंभर प्रश्न सोडवल्यामुळे त्याला चॅम्पियनशिप ऑफ चॅम्पियन मिळाली. येत्या २७ मे २०२५ महिन्यामध्ये होणाऱ्या लंडन अबॅकस चॅम्पियनशिपसाठी चि. रोहन राहुल ढोके याची निवड झाली आहे. वर्ल्ड अबॅकस चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये भारत, ऑस्ट्रेलिया, मलेशिया, अमेरिका, तैवान, चीन, जपान, सिंगापूर अशा जगातील ११ देशातील १९४५ एकूण विद्यार्थ्यां पैकी रोहन राहुल ढोकेची चॅम्पियनशिप चॅम्पियन फर्स्ट यश मिळवून जागतिक स्तरावर निवड झाली आहे. इंटरनॅशनल अबॅकस स्पर्धेमध्ये ब्रेन किड्स स्तरावरील प्रतिष्ठित समजले जाणारी तसेच अबॅकस इंटरनॅशनल सर्वोत्कृष्ट जागतिक विद्यार्थ्यांचे प्रथम यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाच्या कार्यक्रमांमध्ये अबॅकस मास्टर ट्रेनर डॉ. घोडके सर प्रमुख श्री कुदळे सर, संतोष शेकडे यांनी सत्कार केला. रोहन ढोके यांच्या या ऐतिहासिक उज्ज्वल यशाबद्दल त्याचे आई-वडील, मित्रपरिवार, नातेवाईक तसेच शहरातील प्रतिष्ठित व्यक्तींनी सत्कार करून त्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.







गेवराई: तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषी पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली याप्रसंगी प्राचार्य थिटे ए.एस, पर्यवेक्षक राजेंद्र रांजवण, सोनवणे आर. आर यांच्यासह सर्व कर्मचारी उपस्थित होते.



बीड: तालुक्यातील पिंपळवाडी विद्यालयात हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी पिंपळवाडी चे सरपंच, उपसरपंच, गावातील प्रतिष्ठित नागरिक, शाळेचे मुख्याध्यापक प्रदीप जगताप, सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# शिवजन्मोत्सवनिमित्त लिंबागणेश येथे शिवरायांच्या शुर शिलेदारांना छायाचित्रांसह फलकाद्वारे मानवंदना




लिंबागणेश : बीड तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती लिंबागणेश यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त शुर शिलेदाराना मानवंदना देत इतिहासाच्या पानांवरती माहिती दुर्मिळ असलेल्या कर्तृत्ववान शुरवीर मावळ्यांची व शिलेदारांचा जाज्वल्य इतिहास यावर्षी शिवतीर्थ याठिकाणी फलकाद्वारे लावण्यात आला आहे.या आदर्श उपक्रमामुळे दुर्मिळ इतिहासाची माहिती छायाचित्रासह सर्व सामान्य माणसापर्यंत पोहोचत आहे.शिवरायांच्या शुरवीर मावळ्यांमध्ये नरवीर सुभेदार तानाजी मालुसरे, वीरबाजी पासलकर, सरनौबत येसाजी कंक,शिवरत्न जिवाजी महाले, गुप्तहेर बहिर्जी नाईक शिव रक्षक संभाजी कावजी स्वराज्याचे पहिले सेनापती बाजी पासलकर वीर योद्धा शेलार मामा निष्ठावंत मावळा सिद्धी हिलाल,अशा शुरवीर शौर्य गाजवलेल्या मावळ्यांची छायाचित्रासह माहिती फलकाद्वारे देण्यात आली आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT